ePaper

# राहुल गांधींची 'भारत जोडो' यात्रा महाराष्ट्रात दाखल



| वर्ष - 6 | अंक - 205 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- उद्धव ठाकरेंचा राष्ट्रवादीला धक्का
- पिंपरी-चिंचवडमधील लघु उद्योजकांना दिलासा
- सत्तारांकडून सुप्रिया सुळेंना शिवीगाळ: "...तर CM शिंदेंना मंत्रालयात...

www.mahaenews.com | मंगळवार | दिनांक 8 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# सत्तारांविरोधात उद्रेक!

## राष्ट्रवादीची मागणी : मंत्रिपदाचा तात्काळ राजीनामा घ्या

**।पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**राज्यात नव्याने स्थापन झालेल्या सरकारमधील मंत्र्यांची सातत्याने बेताल आणि बेजाबदार वक्तव्ये सुरू असून तमाम महिलांचा अवमान या मंत्र्यांकडून केला जात आहे. आमच्या नेत्या सुप्रिया सुळे यांच्यासारख्या संसदरत्नाबद्दल अब्दुल सत्तार यांनी केलेली वक्तव्ये ही अत्यंत अश्लाघ्य, निंदनिय आणि निषेधार्ह आहेत. सत्तार यांनी केवळ माफी मागून चालणार नसून त्यांचा राजीनामा घेऊन त्यांना पदमुक्त केले पाहिजे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली.**



राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी एका कार्यक्रमादरम्यान राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्या तथा संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे यांच्याबाबत मत प्रदर्शित करताना अत्यंत खालच्या स्तराची भाषा वापरली होती. त्याचा निषेध करण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादीच्या वतीने पिंपरी चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर निषेध आंदोलन करण्यात आले. त्यावेळी अजित गव्हाणे बोलत होते.महिलाध्यक्षा कविता आल्हाट म्हणाल्या, सुपियाताईबद्दल बोलण्याची लायकी नसणार्या सत्तारांनी सत्ता आणि पैशांच्या मस्तीतून हे वक्तव्य केले आहे. ज्यांच्या खोक्याची किर्ती संपूर्ण राज्यभर पसरली आहे.

सुसंस्कृती महाराष्ट्राच्या परंपरेला काळींबा फासण्याचे काम शिंदे-फडणवीस सरकारमधील मंत्री करत आहेत. त्यांना आवरणारेच कोणी राहिलेले नसल्याने उन्मादी बनलेले हे मंत्री महिलांचा अवमान करत आहेत. येत्या निवडणुकांमध्ये महाराष्ट्रातील जनता या लोकांना धडा शिकविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असेही आल्हाट म्हणाल्या.

> खोके घेऊन स्वत:च्या पक्षाची गद्दारी करणे मंत्री झाले आहेत. पैसा आणि सत्तेच्या जोरावर त्यांची सध्या बेताल वक्तव्ये सुरू आहे. तमाम महिला वर्गाचा अवमान करण्याएवढी त्यांची मजल पोहोचेली आहे. केवळ माफी मागून चालणार नाही. अत्यंत खालच्या स्तराची भाषा वापरणार्या अब्दुल सत्तार यांचा राजीनामा घेतलाच पाहिजे या मागणीवर राष्ट्रवादी काँग्रेस ठाम असून सत्तारांचा मुख्यमंत्र्यांनी राजीनामा न घेतल्यास आंदोलनाची तीव्रता आणखी वाढविली जाईल.
>
> **- अजित गव्हाणे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी.

यावेळी झालेल्या आंदोलनात शहराध्यक्ष अजित गव्हाणे महिला अध्यक्ष कविता अल्हाट माजी नगरसेविका शमीम पठाण, माजी नगरसेवक मयूर कलाटे, प्रवीण भालेकर, प्रसाद शेट्टी, संतोष बारणे, यांच्यासह विजय लोखंडे, शहर खजिनदार दीपक साकोरे पंडित गवळी, शितल हगवणे, युवती अध्यक्षा वर्षा जगताप, विद्यार्थी अध्यक्ष यश साने, सोशल मिडीया समन्वयक समीर थोपटे, संजय अवसरमल, मनिषा गटकळ, सारिका पवार, कविता खराडे, दत्तात्रय जगताप,अकबर मुल्ला, सुनिता अडसूळ, निर्मला माने, संगीता कोकणे, उज्वला शिंदे, पुनम वाघ, रवीआप्पा सोनवणे, ज्योती निंबाळकर, मिरा कदम, तृप्ती सोमनाथ मोरे, सुप्रिया सोलंकुरे, स्मिता भोसले, धनंजय भालेकर, मिरा कुदळे, प्रफुल्ल महोत्सलिंग, अनंत सुपेकर, ऋषिकेश शिंदे, झीनत इनामदार, उत्तम कांबळे, तुषार ताम्हाणे, मंगेश खंडागळे, दिपक गुप्ता, ओम क्षीरसागर, विजय दळवी, यांच्यासह अनेक महिला व पक्षाचे कार्यकर्ते सहभागी झालेले होते.

### गोवंश संवर्धन केंद्र, पेट हॉस्पिटलसह विविध प्रकल्पांचे नियोजन

# विधायक : मुक्या जनावरांच्या सुविधांसाठी आमदार लांडगे यांचा पुढाकार!

### महापालिका प्रशासक व आयुक्त शेखर सिंह यांना सूचना

**। पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे २७ लाखांच्या घरात आहे. दिवसेंदिवस शहराचा चौफेर विस्तार होत असून, वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पायाभूत सुविधा आणि सेवा सक्षमपणे उलब्ध करुन देण्याचे आव्हान महापालिका प्रशासनाला पेलावे लागणार आहे. त्यासाठी नियोजित प्रकल्प उभारण्याबाबत जागा उपलब्ध करुन



द्याव्यात. तसेच, संबंधित प्रकल्प मार्गी लावण्याबाबत प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशा सूचना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी केल्या आहेत. याबाबत महापालिका प्रशासक व आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, शहरातील गोवंश संवर्धनाच्या दृष्टीने गो-शाळा विकसित करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, संघटनांनी अनेकदा मागणी केली आहे. त्यामुळे गो-शाळा उभारणीकरीता सुमारे ६ एकर जागा उपलब्ध होणे अपेक्षीत आहे. चऱ्होली-मोशी आदी भागात मोठ्या प्रमाणात गोवंश आहे. त्यासाठी सुविधा निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

तसेच, 'डॉग पार्क' आणि पेट हॉस्पिटलसाठी सुमारे ५ एकर जागा उपलब्ध व्हावी. शहरातील नागरिकांना आपले श्वान डॉग पार्कमध्ये फिरायला घेवून जाण्यासह श्वानांशी संबंधित सर्व वस्तू आणि सेवा, उपचार, प्रशिक्षण, नसबंदी केंद्र यासह अगदी जलतरण तलावसुद्धा उपलब्ध झाला पाहिजे. याकरिता डॉग पार्क विकसित करण्याची आवश्यकता आहे. मोठ्या जनावरे मृत झाल्यास त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न उपस्थित होते. त्यामुळे जनावरांच्या मृतदेहांची विल्हेवाट लावण्याकरिता विद्युत दाहिनी सुविधा उपलब्ध केली पाहिजे. त्यासाठी किमान १ एकर जागेची आवश्यकता आहे. कारण, भविष्यात पाळीव प्राणी हे नागरी जीवनाचा अविभाज्य भाग असेल हे पाहता त्यांना अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

> पुण्यातील स्व. राजीव गांधी प्राणीसंग्रहालयाच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये प्राणीसंग्रहालय विकसित करण्याची आवश्यकता आहे. सदर प्राणीसंग्रहालय १३० एकरमध्ये विकसित केले आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये किमान ३० एकर जागेवर प्राणीसंग्रहालय विकसित करावे. शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता पर्यटन विकासाच्या दृष्टीने प्रशासनाने प्राधान्याचे विचार करणे काळाची गरज आहे. प्राणी संग्रहालय विकासित झाल्यास महापालिकेच्या उत्पन्नातही वाढ होणार आहे. त्यासंदर्भात प्रशासनाला सूचना केल्या आहेत.
>
> **- महेश लांडगे,** शहराध्यक्ष व आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# उद्धव ठाकरेंचा राष्ट्रवादीला धक्का!

## दिग्गज नेत्याच्या कन्येच्या हाती बांधले शिवबंधन

। मुंबई। महाईन्यूज।

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अंकुश काकडे यांच्या कन्येने शिवबंधन हाती बांधले. मेघना काकडे-माने यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे (Uddhav Thackeray) यांच्या उपस्थितीत त्यांनी पक्षप्रवेश केला. हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी धक्का मानला



जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अंकुश अण्णा काकडे यांच्या कन्या मेघना काकडे-माने यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्री निवासस्थानी मेघना काकडे यांनी हातात शिवबंधन बांधलं.

यावेळी नीलम गोऱ्हे, सुषमा अंधारे, अनिल परब, सचिन अहिर, आदेश बांदेकर हे नेते उपस्थित होते. मेघना काकडे माने या मुंबईच्या अंधेरी भागात राहतात.

अंकुश काकडे हे पुण्याचे माजी महापौर आहेत. काकडे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रीय असून ते पक्षाच्या प्रवक्तेपदी आहेत. अंकुश काकडे यांनी अनेक वेळा भाजप, शिंदे गट यांच्यावर टीकास्त्र सोडलेलं आहे.

शिंदे गटातील नेते आणि कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरुन अंकुश काकडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इशारा दिला होता. 'सत्तारला माफी मागायला सांगा, नाही तर त्याचं काय करायचं ते आम्ही करु' असं आक्रमक ट्वीट अंकुश काकडे यांनी केलं होतं.

# घाऊक बाजारातच भाजी किरकोळपेक्षा महाग!

## डमी आडत्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

।पुणे। महाईन्यूज ।

गुलटेकडी येथील श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डमध्ये किरकोळ बाजारातील दरांपेक्षाही अधिक दराने भाजीपाल्याची विक्री होत असल्याचे रविवारी निदर्शनास आले. एकीकडे घाऊक बाजारात मेथी गड्डी आठ ते १५ रुपये आणि कोथिंबीर गड्डी आठ ते १२ रुपये दराने विक्री होत असताना, डमी आडते त्याच आवारात मेथी गड्डी २० ते २५ रुपये आणि कोथिंबीर गड्डी १५ ते २५ रुपये दराने विकत होते. या सर्व प्रकाराकडे बाजार समिती प्रशासनाचा काणाडोळा होत आहे.



बाजारातील गाळ्यांसमोर आडत्यांच्या नावावर डमी आडत्यांची संख्या वाढली आहे. हा बाजार आवार घाऊक व्यापारासाठी आहे. मात्र, प्रत्यक्षात येथे किरकोळ विक्री वाढली आहे. मूळ गाळेधारक, व्यापाऱ्यांकडून कमी दरात शेतमाल खरेदी करून गाळ्यासमोरच चढ्या दराने विक्री करण्याचे प्रकार सुरू आहेत. त्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. त्यामुळेच डमी विक्रेते किरकोळ बाजाराप्रमाणे अव्वाच्या सव्वा दर आकारून भाजीपाल्याची विक्री करीत आहेत. 'किरकोळ बाजाराच्या तुलनेत मार्केट यार्डात भाजीपाला स्वस्त मिळेल' या अपेक्षेने अनेक नागरिक मार्केट यार्डमध्ये भाजी खरेदीसाठी जातात. बहुतांशी नागरिक घाऊक बाजाराच्या हिशेबानेच किमान वजन किंवा जुड्यांची खरेदी करतात. मात्र, तरीही त्यांचा अपेक्षाभंग होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणी बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी प्रतिक्रिया दिली नाही.

### गाळ्यावर आठ रुपये; गाळ्याबाहेर 20 रुपये

**बाजारातील एका गाळ्यावर रविवारी घाऊकमध्ये कोथिंबीर गड्डी आठ ते १२ रुपये, मेथी गड्डी आठ ते १५ रुपये, शेपू गड्डी सहा ते आठ रुपये, कांदापात १० ते १२ रुपये, पुदीना तीन ते सहा रुपये आणि पालक गड्डी आठ ते १४ रुपये दराने उपलब्ध होती. मात्र, त्याच गाळ्याबाहेर रस्त्यावर बसलेल्या डमी आडत्याकडे कोथिंबीर १५ ते २५ रुपये, मेथी २० ते २५, शेपू २० रुपये, कांदापात २० ते २५ रुपये, पालक २० ते ३० रुपये दराने विकली जात होती.**

### 'सेस'वर पाणी

**डमी आडत्यांनी रस्त्यातच शेतमालाची दुकाने थाटल्याने बाजाराच्या आवारात वाहतूक कोंडी होत आहे. किरकोळ व्यापारी, नागरिकांना चालण्यासही जागा उरत नसल्याचे दिसून आले. यावर बाजार समितीच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा धाक नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच, आडत्यांकडून शेतमाल घेऊन त्याच ठिकाणी किरकोळ विक्री होत असल्याने बाजार समितीचेही सेसरूपी उत्पन्न कमी होत असून, बाजार समितीकडून या उत्पन्नावर पाणी सोडले जात आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

> **आम्ही उपनगरात राहतो. मार्केट यार्डमध्ये भाजी तुलनेने स्वस्त मिळेल, असे वाटले. त्यामुळे रविवारी सकाळीच भाजी खरेदीसाठी गेलो. तेथे गेल्यावर पालेभाज्यांचे दर विचारले असता ते आमच्या घराजवळील भाजी विक्रेता आकारत असलेल्या दराप्रमाणेच असल्याचे स्पष्ट झाले. काही भाज्या, तर किरकोळ बाजारापेक्षा महाग होत्या.**
>
> **- राधिका काळे, नागरिक**

# जांभूळवाडी दरीपूलावर अपघात ; बस मधील प्रवशी जखमी

आंबेगाव । महाईन्यूज ।

साताऱ्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनर ला बसने पाठीमागून धडक दिल्याने विचित्र अपघात जांभूळवाडी दरीपुलाजवळ आज रात्री आठ वाजनेच्या सुमारास झाला आहे.

साधारण बसमधील ८० टक्के प्रवासी जखमी झाले. बसमध्ये किती प्रवासी प्रवास करीत होते याची माहिती मिळाली नसली तरी बस पूर्ण क्षमेतेने भरली असल्याचे प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले.



**साधारण बसमधील ८० टक्के प्रवासी जखमी झाले. बसमध्ये किती प्रवासी प्रवास करीत होते याची माहिती मिळाली नसली तरी बस पूर्ण क्षमेतेने भरली असल्याचे प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले.दरम्यान, या अपघातात बसचा चालक गंभीर जखमी झाला असून बसच्या केबिनमध्ये बसलेले अन्य दोघे जणही जखमी झाले आहेत. घटनास्थळी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी तसेच राष्ट्रीय महामार्ग पेट्रोलिंगचे कर्मचारी पोहचले असून जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात येत आहे.**

दरम्यान, या अपघातात बसचा चालक गंभीर जखमी झाला असून बसच्या केबिनमध्ये बसलेले अन्य दोघे जणही जखमी झाले आहेत. घटनास्थळी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी तसेच राष्ट्रीय महामार्ग पेट्रोलिंगचे कर्मचारी पोहचले असून जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात येत आहे.

बोगद्याबाहेर सहा वाहनांचा विचित्र अपघात आंबेगाव बस आणि कंटेनर अपघाताच्या घटनास्थळापासून दोनशे मीटर अंतरावर हा अपघात झाला आहे. यामध्ये जीवित हानी झाली नसली तरी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हा अपघात दरीपुल येथे झाला असून सहा गाड्या एकमेकावर आदळल्याचे प्रत्यक्षदर्शीने सांगितले आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील लघु उद्योजकांना दिलासा!

## प्रलंबित समस्यांबाबत दि. 19 नोव्हेंबरला बैठक, राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांचे आश्वासन





**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील औद्योगिक वसाहतींमधील लघु उद्योजकांच्या प्रलंबित समस्या सोडवण्याबाबत राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, संघटनेचे पदाधिकारी आणि उद्योजक प्रतिनिधी यांची दि.१९ नोव्हेंबर २०२२ रोजी बैठक घेण्यात येणार आहे. त्यामुळे लघु उद्योजकांना दिलासा मिळाला आहे.**

पिंपरी-चिंचवड ऑटो क्लस्टर येथे सुरू असलेल्या "पुणे म्यॅनुफॅक्चरींग एक्पो- २०२२" प्रदर्शनाला राज्याचे उद्योग मंत्री श्री. उदय सामंत यांनी भेट दिली. यावेळी नवोदित उद्योजकांसोबत त्यांची चर्चा केली. तसेच, पिंपरी-चिंचवड लघु उद्योग संघटनेच्या विविध मागण्यांसदर्भात मंत्री महोदय यांना निवेदन दिले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, लघु उद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, जयंत कड, संचालक संजय सातव आणि पदाधिकारी उपस्थित होते.

लघु उद्योग संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने उद्योजकांना पाठविलेल्या एलबीटी नोटीसा रद्द कराव्यात.

एम.आय.डी.सी. च्या जागेवर उभ्या राहणाऱ्या अनाधिकृत झोपडपट्टी हटवण्यात याव्यात. भुयारी गटार योजना व सी.इ.टी. पी.प्लांट उभारण्यासाठी नियोजन करावे. एम.आय.डी.सी मधील मैला वाहून नेण्याची निशुल्क व्यवस्था करावी.

औद्योगिक परिसरातील कचरा समस्या सोडवण्यात यावी. अनधिकृत भंगारची दुकानांवर कारवाई करावी. अनधिकृत माथाडी कामगार संघटनांना प्रतिबंध करावा. औद्योगिक परीसरातील अग्निशमन केंद्राचा प्रश्न अनेक दिवस प्रलंबित असून तो तातडीने मार्गी लावण्यात यावा. औद्योगिक पट्ट्यात पीएमपी बस सुविधा, सार्वजनिक शौचालय उभारणी आदी पायाभूत सुविधा उपलब्ध कराव्यात आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

### महावितरण संदर्भातील समस्यांबाबत साकडे...

कोविड काळात लॉक डाऊनमध्ये व नंतर स्थिर आकार व मागणी तसेच इतर आकार लावले जाणार नाहीत, असे आश्वासन देऊन देखील आता सध्या वीजबिलात हे आकार लावून येत आहेत. ते रद्द करण्यात यावेत तसेच सध्या सर्व वीज बिले ही दुप्पट दराने चुकीची येत आहेत ती दुरुस्त करून मिळवीत.

तसेच, महावितरणचे आयोगाने सप्टेंबर २०१८ मध्ये निश्चत केलेले औद्योगिक वीजदर शेजारील सर्व राज्यांच्या तुलनेने २०% ते ३५% जास्त आहेत. वीज दरवाढ रद्द करण्यात यावी, अशी मागणीही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

---

## भोसरी येथे शिवस्वराज्य किल्ले बनवा स्पर्धा उत्साहात

# गड-किल्ल्यांचे संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी : कविता भोंगाळे

## परिसरातील शिवभक्त अन् बालचमुंचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी या मातीत जन्म घेऊन साडेतीनशे वर्ष झाले. मात्र, त्यांचा विचार, स्मृती गड-किल्ल्यांच्या रूपाने आपणा सर्वांना सदैव प्रेरणा देत आहेत. त्या गडकिल्ल्यांचे रक्षण, संवर्धन करणे प्रत्येकाची जबाबदारी असून, 'किल्ला बनवा' स्पर्धेतून त्याच परंपरेला आम्ही कृतीची जोड देण्याचा प्रयत्न करीत आहोत. शिव विचार नव्या पिढीत रुजवण्याचा आमचा संकल्प आहे, अशा भावना भाजपा महिला मोर्चाच्या सरचिटणीस कविता भोंगाळे यांनी व्यक्त केल्या.

भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भोसरी येथे भाजपा महिला मोर्चा व कविता भोंगाळे युवा मंचच्या संयुक्त विद्यमाने दीपावलीच्या निमित्याने शिवस्वराज्य किल्ला बनवणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी कविता भोंगाळे बोलत होत्या. मंचच्या वतीने किल्ला बनवणे स्पर्धेच्या आयोजनाचे हे दुसरे वर्ष होते या स्पर्धेला भोसरी परिसरातील शिवभक्त तसेच बालचमुकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

यावेळी कल्पना धाडसे, मनीषा गंगणे, सुमन उंडे, आशा घुगे, वैशाली कापसे, चरणदास वानखेडे, वेदंता शिंदे, सुरेखा सवाई, जयंत अंबेकर, संतोष जठार, दत्ता मोहिते, प्रभाकर चव्हाण, विनोद शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

### शिवराज आंबेकर याला प्रथम पारितोषिक...

**स्पर्धेत शिवराज आंबेकर याने साकारलेल्या प्रतापगडाच्या प्रतिकृतीला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. स्पर्धेत प्रथम क्रमांक शिवराज आंबेकर, द्वितीय क्रमांक सार्थक बेहरा, तृतीय क्रमांक अनिकेत जोहरकर, चतुर्थ क्रमांक प्रेम कापसे, हर्ष कोडगीरे, यांनी स्पर्धेत बाजी मारली. विजेत्याना तसेच सहभागी स्पर्धकांना छत्रपती शिवाजी महाराजांची आकर्षक पूर्णाकृती प्रतिकृती तसेच सन्मानपत्र देत सन्मानित भाजपा महिला मोर्चा सरचिटणीस कविता भोंगाळे यांच्या हस्ते करण्यात आले.**

## संपादकीय »

# साथ आणि संवाद

***गुरुवारी दिल्लीत कस्तुरबा गांधी मार्गावरील मशिदीत मोहन भागवत 'हिंदू आणि मुस्लिम यांचा डीएनए एकच आहे,' असे म्हणत होते; तेव्हा राष्ट्रीय तपास यंत्रणा म्हणजे एनआयए देशभरात व्यापक कारवाईत शंभराहून अधिक संशयितांना जेरबंद करीत होती.***

'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' असे साळसूद नाव घेऊन देशविरोधी कारवाया करणाऱ्या कट्टर इस्लामी संघटनेवर देशव्यापी छापे पडावेत, त्याच दिवशी सरसंघचालक मोहन भागवत यांनी राजधानीत एका मशिदीत जाऊन इमामांशी आणि मुस्लिम नागरिकांशी चर्चा करावी आणि नेमक्या त्याच दिवशी 'पॉप्युलर फ्रंट'चे मोठे जाळे असणाऱ्या महाराष्ट्रात मुस्लिमांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचविण्यासाठी राज्य सरकारने अभ्यासगट स्थापन करावा, हा कुणालाही विलक्षण योगायोग वाटेल. तसा तो असला तरी या तीनही घटनांच्या मागे एक निश्चित सूत्र आहे. गरीब, अविकसित मुस्लिम समाजाला संवाद साधून सोबत घ्यायचे आणि त्याचवेळी, दहशती वृत्तीला नेस्तनाबूत करायचे, असे हे सूत्र आहे. ते विचारपूर्वक ठरलेले दिसते. भागवत यांनी मागे राजधानीत जी तीन व्याख्याने दिली; तेव्हापासून या प्रयत्नांना वेग आला आहे. गुरुवारी दिल्लीत कस्तुरबा गांधी मार्गावरील मशिदीत मोहन भागवत 'हिंदू आणि मुस्लिम यांचा डीएनए एकच आहे,' असे म्हणत होते; तेव्हा राष्ट्रीय तपास यंत्रणा म्हणजे एनआयए देशभरात व्यापक कारवाईत शंभराहून अधिक संशयितांना जेरबंद करीत होती. 'पीएफआय'वरील ही कारवाई इतकी मोठी आणि नियोजनपूर्वक झाली आहे की, या संघटनेची पाळेमुळे खणून काढण्याचा निर्धार त्यातून दिसतो. त्याचे स्वागत करायला हवे. अशी कारवाई म्हणजे त्या समाजाच्या विरोधातली कारवाई नसते. मात्र, यापूर्वी अनेकदा अशा संशयितांची धरपकड म्हणजे त्या समाजावरचा हल्ला, असे चित्र निर्माण केले गेले. त्यात अनेकांचा राजकीय स्वार्थही होता. भागवत यांनी साधलेल्या संवादाकडे या दृष्टीनेही पाहायला हवे.

इतका विविधतेने नटलेला, अनेक पंथ अनुसरणारा आणि भारतीय संस्कृतीचे विविध आविष्कार दाखविणारा इस्लाम जगाच्या पाठीवर इतरत्र कुठेही नाही. मात्र, इस्लामला मोनोलिथ म्हणजे एकाश्म बनवून टोकेरी, कडवट, असहिष्णू करत नेणे, हाच कडव्या संघटनांचा उद्देश असतो. हिंदूंनाही हा धोका नाही, असे नाही. 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' देशभर हेच करीत होती. कडव्या इस्लामचा पुरस्कार, नामानिराळे राहून हत्या घडवणे आणि दंगलसदृश वातावरण धगधगत ठेवणे, ही कामे फ्रंट करीत होती. पुढच्या काही दशकांत संपूर्ण भारत इस्लामी करण्याचे उद्दिष्ट फ्रंटने समोर ठेवले होते. हे होणे अशक्य आहे, हे सर्वांना माहीत असले तरी अशी वेडगळ ध्येये ठेवली की तरुणांच्या डोक्यात विखार आणि इंधन भरणे सोपे जाते. गेल्या काही महिन्यांमध्ये भारतात 'धर्मद्रोहाचा ठपका ठेवून' थंड डोक्याने ज्या हत्या झाल्या, त्यामागे ही 'मेंदूधुलाई'ची कार्यपद्धती होती.



## आनंदी सकाळ

# सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु।

महाभारतात आपण वाचतो की, ज्या वेळेला ज्यांनी ज्यांनी धर्माचरण केले, त्या त्या वेळेला तो तो विजयी झाला. धर्माचरणात ज्यांनी कुठेतरी शबलता निर्माण केली, भेसळ केली त्या क्षणाला तो पराभूत झाला. भीष्माचार्य व अर्जुन यांच्या युद्धात लौकिक अर्थाने भीष्माचार्य पडले.पण त्यांना मारण्यासाठी अर्जुनाने त्यांच्याच सांगण्याप्रमाणे शिखंडीला समोर उभे केले. स्वतः केलेल्या प्रतिज्ञेमुळे भीष्माचार्यांनी शस्त्र खाली ठेवले. धर्माचरण केले. नैतिक विजय भीष्माचार्यांचाच झाला. 'भीष्मप्रतिज्ञा' हा शब्द रूढ आहे. आपण 'धर्मप्रतिज्ञा' असे म्हणत नाही, तर 'भीष्मप्रतिज्ञा' म्हणतो. कारण, 'भीष्मप्रतिज्ञे'मध्येच धर्म आहे. धर्माचे रक्षण केल्यामुळे भीष्माचार्य अजरामर झाले. भगवान श्रीकृष्णाच्या आज्ञेवरून पांडवांनी भीष्माचार्यांकडूनच धर्माचे सम्यक ज्ञान प्राप्त करून घेतले.

# 'सायबर' गुन्ह्यांचे आव्हान




सध्या गुन्ह्यांचे स्वरूप बदलले आहे. रस्त्यावरील गुन्हेगारी कमी झाली असून, गुन्हेगारांचा कल कमी जोखमीच्या सायबर क्षेत्राकडे वळला आहे. त्यामुळे सायबर फसवणूक रोखण्यासाठी सावधगिरी आणि सायबर साक्षरता हाच उपाय आहे.

इंटरनेटमुळे दैनंदिन जीवन सुलभ बनले आहे आणि वेळेची बचतही होत आहे. मात्र, या सायबर विश्वात वावरताना कोणती काळजी घ्यावी, काय करावे, काय करू नये याबाबत पुरेसे ज्ञान नसल्याने या विश्वात टपून बसलेले सायबर चोर संधी मिळताच हल्लाबोल करीत आहेत. पकडले जाण्याची जोखीम कमी आणि फायदाच फायदा असल्याने आर्थिक फसवणूक, सेक्सटॉर्शन, बदनामी, सोशल पाठलाग, अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण



असे सायबरमधील गुन्हे इतर गुन्ह्यांच्या तुलनेत कित्येक पटीने वर्षागणिक वाढत आहेत.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोने देशभरातील सायबर गुन्ह्यांची जारी केलेली आकडेवारी पाहिली तर हा विषय किती गंभीर आहे याची कल्पना येते. देशभरात २०२१ मध्ये ५० हजार ९७४ सायबर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. हा आकडा २०२० च्या तुलनेत जवळपास सहा टक्क्यांनी अधिक आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर २०२१ मध्ये ५५६२ गुन्हे दाखल असून, सायबर गुन्ह्यांमध्ये राज्य चौथ्या क्रमांकावर आहे. सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे महिला, लहान मुले यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या लैंगिक शोषणाबाबत नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोच्या आकडेवारीनुसार राज्यात ४८७ गुन्हे आहेत आणि या प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. सोशल मीडियाच्या व्यासपीठावर १३ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांचा बऱ्यापैकी वावर असतो. अमेरिका, तसेच पाश्चात्त्य देशांमध्ये सोशल मीडिया वापरण्यासाठी १३ वर्षे पूर्ण हवीत. मात्र, आपल्याकडे यासाठी कोणतेही नियम, अटी अथवा कायदे नाहीत. या वयोगटातील मुले अल्पवयीन, कमी समज असलेली आणि इंटरनेटबद्दल पुरेसे ज्ञान नसलेली असतात. अशा मुलांना प्रेमाच्या जाळ्यात ओढले जाते. त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवून आपलेसे करून त्यांचे लैंगिक शोषण केले जाते. त्यातूनच चाइल्ड पोर्नोग्राफी, 'सेक्सटॉर्शन' यांसारखे गंभीर गुन्हे जन्माला आले आहेत. चाइल्ड पोर्नोग्राफी रोखण्यासाठी केंद्र सरकारने कडक कायदे केल्यानंतर, त्याबाबत धडक कारवाया सुरू आहेत. चाइल्ड पॉर्न व्हिडिओ किंवा त्यासंबंधी कोणता व्हिडिओ, फोटो तुम्ही कुणाला पाठवला तर तुम्हाला जेलमध्ये जावे लागू शकते. हे रोखण्यासाठी अमेरिकेच्या 'नॅशनल सेंटर ऑफ मिसिंग अँड एक्स्प्लॉयटेड चिल्ड्रन'(एनमॅक) ही संस्था चाइल्ड पोर्नोग्राफीच्या विरोधात कार्यरत आहे. समाजमाध्यमे, संकेतस्थळांवरील चाइल्ड पोर्नोग्राफीबाबत ही संस्था अमेरिकेच्या 'फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन'(एफबीआय) या सर्वोच्च तपास यंत्रणेला माहिती पुरवते. भारतातून अशा ध्वनिचित्रफिती किंवा मजकूर जाहीर करणाऱ्या व्यक्तींची तांत्रिक माहिती पुरवण्याबाबत या संस्थेशी केंद्रीय गृह मंत्रालयाच्या राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाने (एनसीआरबी) करार केला आहे.

# काळजी निवृत्तांची की 'पेन्शन फंडा'ची?

**सर्वोच्च न्यायालयाने ४ नोव्हेंबर रोजी 'कर्मचारी निवृत्तिवेतन ( सुधारणा) योजना, २०१४' वैध असल्याचा निर्णय दिला आहे.**

परंतु १५ हजार रुपयांपेक्षा जास्त वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांना १.१६ टक्के अतिरिक्त वर्गणी देण्यासंबंधीची तरतूद अवैध ठरविली आहे. तसेच ज्या पात्र कर्मचाऱ्यांना या योजनेत सहभागी व्हावयाचे असेल त्यांना चार महिन्यांची मुदत देण्यात आलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने या दोन बाबींव्यतिरिक्त कर्मचारी निवृत्तिवेतन योजना, २०१४ वैध ठरविल्याने, कर्मचाऱ्यांचा या निर्णयामुळे खरोखरच फायदा होणार आहे का? निवृत्तिवेतन पात्र पगाराची मर्यादा ६५०० वरून १५ हजार केल्यामुळे प्रत्यक्षात कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळालेला आहे का? सरासरी वेतनासंबंधी सरकारने केलेला बदल सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरविणे योग्य आहे का? यासंबंधीची वस्तुस्थिती पाहणे आवश्यक आहे.

केंद्र सरकारने २२ ऑगस्ट, २०१४ रोजी अधिसूचना काढून त्याद्वारे 'कर्मचारी निवृत्तिवेतन (दुरुस्ती) योजना, १९९५' मध्ये काही दुरुस्त्या करून त्या १ सप्टेंबर, २०१४ पासून लागू केल्या. या दुरुस्त्यांमध्ये निवृत्तिवेतन पात्र वेतनाची मर्यादा प्रतिमाह ६५०० रुपयांवरून १५ हजार रु. करणे,



निवृत्तिवेतन १२ महिन्यांऐवजी ६० महिन्यांच्या सरासरी वेतनाआधारे निश्चित करणे आदी तरतुदींचा समावेश होता. सदर योजनेला कर्मचारी तसेच त्यांच्या संघटनांनी केरळ, दिल्ली व राजस्थान उच्च न्यायालयांमध्ये आव्हान दिले. केरळ उच्च न्यायालयाने व नंतर दिल्ली व राजस्थान उच्च न्यायालयांनी सदरची 'कर्मचारी निवृत्तिवेतन (दुरुस्ती) योजना, २०१४' अवैध ठरवून ती रद्दबातल केली. त्यावर कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ) व केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. सर्वोच्च न्यायालयाने ते अपील फेटाळले. त्यावर दाखल केलेल्या पुनर्विचार याचिकेवर ४ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या त्रिसदस्य पीठाने दिलेल्या निकालात सदरची निवृत्तिवेतन (दुरुस्ती) योजना वैध ठरवून केरळ, दिल्ली व राजस्थान उच्च न्यायालयांचे निर्णय रद्द केले. मात्र, १५ हजार रु.पेक्षा जास्त वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांना १.१६ टक्के अधिक वर्गणी देण्यासंबंधीची तरतूद अवैध ठरवली. त्याचप्रमाणे राज्यघटनेच्या अनुच्छेद १४२ अन्वये प्राप्त अशा खास अधिकारांच्या आधारे, ज्या पात्र कर्मचाऱ्यांना या योजनेत सहभागी व्हावयाचे असेल त्यांना चार महिन्यांची मुदत न्यायालयाने स्वत:हून दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामधील काही मुद्द्यांचा या लेखात विचार केलेला आहे. निवृत्तिवेतनाची रक्कम काढण्यासाठीचे सूत्र : "कमाल सरासरी वेतन (पेन्शनेबल सॅलरी) X एकूण नोकरीची वर्षे/ ७०" असे असते. या सूत्राचा विचार करता मासिक निवृत्तिवेतनाची रक्कम निश्चित करण्यासाठी 'पेन्शनेबल सॅलरी' अत्यंत महत्त्वाची असते. १ सप्टेंबर, २०१४ पूर्वी १२ महिन्यांच्या सरासरी पगाराआधारे 'पेन्शनेबल सॅलरी' निश्चित केली जात असे. आता कर्मचारी निवृत्तिवेतन (दुरुस्ती) योजना, २०१४ मध्ये १२ महिन्यांच्या ऐवजी ६० महिन्यांच्या सरासरी पगाराच्या आधारे 'पेन्शनेबल सॅलरी' ठरेल.

## ।। अभंगवाणी ।।



वळितें जें गाई ।
त्यासि फार लागे काई ।।१।।
निवे भावाच्या उत्तरीं ।
भलते एके धणी वरी ।।धृ.।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### हृदयविकाराच्या रुग्णांना मिळणार तत्काळ उपचार



। मुंबई । महाईन्यूज ।

हृदयविकार हे महाराष्ट्रात होणाऱ्या मृत्यूंचे एक प्रमुख कारण असून हृदयविकारामुळे होणाऱ्या अकाली मृत्यूंचे प्रमाण कमी करणे हे आरोग्य व्यवस्थेसमोरील एक प्रमुख आव्हान आहे. या आव्हानाचा सामना करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाच्या माध्यमातून सध्या राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये ‘स्टेमी महाराष्ट्र’ हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. लवकरच संपूर्ण राज्यात या प्रकल्पाचा विस्तार केला जाणार असल्याचे आरोग्य विभागातील ज्येष्ठ डॉक्टरांनी सांगितले. हृदयरुग्णांसाठी वरदान ठरणारा हा प्रकल्प असून यासाठी आरोग्य यंत्रणेतील डॉक्टर व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. ‘स्टेमी’ (म्हणजे एसटी एलिव्हेशन इन मायोकार्डियल इन्फाक्शन) हा सामान्यतः आढळणारा हृदयविकाराचा प्रकार आहे.

# सत्तारांकडून सुप्रिया सुळेंना शिवीगाळ: “... तर CM शिंदेंना मंत्रालयात बसू देणार नाही!

## 3 मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी, NCP आक्रमक

। मुंबई । महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबरच्या बंडखोर गटातील नेते आणि राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांना शिवीगाळ केल्याचा धक्कादायक प्रकार उघकीस आल्यानंतर राष्ट्रवादीने आक्रमक भूमिका घेतली आहे. सत्तार यांनी सुप्रिया सुळेंना शिवीगाळ केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर राष्ट्रवादीने अब्दुल सत्तार यांच्या मुंबईतील शासकीय निवासस्थानासमोर आंदोलन केलं. यावेळी अब्दुल सत्तारांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून सत्तारांच्या घरावर दगडफेकही करण्यात आली. यात त्यांच्या घराच्या खिडकीच्या काचा फुटल्या. तर राष्ट्रवादीच्या महिला आघाडीच्या नेत्या विद्या चव्हाण यांनी सत्तार यांच्यासहीत तीन मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. सत्तार यांच्या शासकीय निवासस्थानाबाहेर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी आंदोलन केलं. या नरिमन पॉइण्ट येथील बंगल्याबाहेरच्या या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येनं महिलाही सहभागी झाल्या होत्या. यावेळेस बोलताना विद्या चव्हाण यांनी अब्दुल सत्तारांसारखा असंस्कृत मंत्री आपण यापूर्वी पाहिला नाही असं म्हटलं आहे. तसेच विद्या चव्हाण यांनी महिलांचा अवमान करणाऱ्या अब्दुल सत्तारांबरोबरच अन्य दोन नेत्यांनीही महिलांचा अवमान करणारं वक्तव्य केलं असून त्यांचाही राजीनामा घ्यावा अशी मागणी केली आहे. “अब्दुल सत्तार, गुलाबराव पाटील आणि रविंद्र चव्हाण या तिघांचा राजीनामा मुख्यमंत्र्यांनी घ्यावा,” असं विद्या चव्हाण म्हणाल्या आहेत. गुलाबराव पाटील सुषमा अंधारेंना नटी वगैरे म्हणतात, रविंद्र चव्हाण बलात्काऱ्यांना सोडण्यासाठी भायखळा तुरुंगात बसून आहे. तर अब्दुल सत्तार सुसंस्कृत खासादाराबद्दल बोलतात, हे निंदनीय आहे, असं म्हणत विद्या चव्हाण यांनी निशेष नोंदवला. “हा महाराष्ट्र जिजाऊंचा महाराष्ट्र आहे. अब्दुल सत्तारचा राजीनामा द्यावा. त्याशिवाय मुख्यमंत्र्यांना मंत्रालयामध्ये बसू देणार नाही. यापूर्वीही आम्ही इशारा दिला होता,” असंही विद्या चव्हाण यांनी म्हटलं आहे. तर राष्ट्रवादीच्या अन्य महिला पदाधिकाऱ्यांनी सत्तार यांच्या घराची तोडफोड कोणी केलेली नाही. तो कार्यकर्त्यांचा संताप आहे, असं म्हटलं आहे. तसेच, “अब्दुल सत्तारांना झोडून काढल्याशिवाय राहणार नाही”, “सत्तार यांनी पाया पडून सुप्रिया सुळेंची माफी मागणी,” असं महिला पदाधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.



### ऊस आंदोलकांना झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ

# कोल्हापूर- सांगली महामार्गावर अंकुश संघटनेचा रास्ता रोको

।कोल्हापूर । महाईन्यूज ।

चालू गळीत हंगामासाठी उसाला 3300 रुपये दर मिळावा आणि ऊस आंदोलकांना झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ सोमवारी आंदोलन अंकुश संघटनेने कोल्हापूर – सांगली महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले. यामुळे या मार्गावरील वाहतुकीमध्ये व्यत्यय निर्माण झाला होता.शिरोळ तालुक्यातील आंदोलनाला काल संघर्षाचे स्वरूप मिळाले. आंदोलन करणाऱ्या अंकुश संघटनेच्या कार्यकर्त्यांना साखर कारखानदार समर्थकांनी मारहाण केली होती.

त्यामध्ये संघटनेचे तालुकाप्रमुख दीपक पाटील जखमी झाल्याने आंदोलन अंकुश संघटनेने कोल्हापूर – सांगली महामार्गावर रास्ता रोको करण्याचा निर्णय जाहीर केला होता.



त्यानुसार सकाळी कार्यकर्ते अंकली जुना टोल नाका येथे जमले. त्यांनी उसाला दर मिळण्याच्या मागणीसाठी घोषणाबाजी करून रास्ता रोको आंदोलन सुरू केले. यामुळे रत्नागिरी – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**सांगली महामार्गावर रास्ता रोको करण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यानुसार सकाळी कार्यकर्ते अंकली जुना टोल नाका येथे जमले. त्यांनी उसाला दर मिळण्याच्या मागणीसाठी घोषणाबाजी करून रास्ता रोको आंदोलन सुरू केले. यामुळे रत्नागिरी – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.**

### ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी

# ठाकरे गटाच्या शिवसेनेचे राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन!

## शिवसेनेचे संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर यांनी शेतकरी अडचणीत

। मुंबई । महाईन्यूज ।

कोल्हापूर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा यासह अन्य मागण्यांसाठी सोमवारी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने पुणे – बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले.

यावर्षी सुरुवातीला पावसाने आणि नंतर परतीच्या पावसाने शेतीचे मोठे नुकसान केले आहे. चांगले उगवून आलेले पीक अतिवृष्टीमुळे हातचे निघून गेले आहे. यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे.

त्यांना आणि ग्रामीण भागाला न्याय देण्यासाठी राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा , शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये विनाअट द्यावेत, शेतमजुरांना २५ हजार रुपयांचे नुकसान भरपाई द्यावी आदी मागण्यांच्या घोषणा करीत आज ठाकरे शिवसेनेच्या वतीने पुणे – बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील शिरोली नाका येथे ठिय्या आंदोलन करण्यात आले. शिवसेनेचे संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर यांनी शेतकरी अडचणीत आला असताना शासन मदत करत नसल्याबद्दल टीका केली.



जिल्हाप्रमुख मुरलीधर जाधव,, उपजिल्हाप्रमुख महादेव गौड, मधुकर पाटील, साताप्पा भवन यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने आंदोलनात उतरले होते. तहसीलदारांनी आंदोलन स्थळी भेट देऊन याबाबत जिल्हा प्रशासनाशी चर्चा घडवून आणण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

# ज्वालामुखीतून बाहेर येतोय धगधगता लावा!

## ज्वाळा पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

निसर्गाचं मनमोहन रुप पाहायला सर्वांनाच आवडतं. पण निसर्ग जितका सुंदर दिसतो तितकंच त्याचं ज्वालाग्राही रुपही पाहायला मिळतं. असाच एक व्हिडीओ समोर आला आहे. ज्यामध्ये ज्वालामुखीतून धगधगता उकळणारा लावा पृथ्वीच्या पृष्ठभागाला फाडून बाहेर येताना दिसत आहे. महत्त्वाचं म्हणजे हा ज्वालामुखी पाहण्यासाठी अनेक पर्यटकांनी गर्दी केली आहे. डोळ्यांच्या पापण्या लवत नाहीत तोवर हा लावा पुढे पुढे सरकत होता.

ज्वालामुखीवर असंख्य ज्वालामुखी आहेत. त्यापैकी फार कमी सक्रीय आहेत. या ज्वालामुखींना झोपलेले राक्षस असं विशेषण देण्यात आलेले नाही. हे ज्वालामुखे केव्हाही जागे होऊन जगाचा विनाश करू शकतात. व्हिडिओमध्येही असेच दृश्य पाहायला मिळत आहे. व्हिडीओमध्ये तुम्ही पहाल की लोक कसं बिनधास्तपणे उभं राहून धगधगता लावा बाहेर पडताना पाहत आहेत. ज्वालामुखीतून उठणाऱ्या या ज्वाला पाहून प्रत्येकालाच भीती वाटेल.

हे विस्मयकारक दृश्य आइसलँडच्या रेकजेनेस द्वीपकल्पाचे आहे. हा ज्वालामुखी पाहण्यासाठी पर्यटक येत असता. यासोबतच हा क्षण संस्मरणीय बनवण्यासाठी हे दृश्य कॅमेऱ्यात कैद केले जातात. हा व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्विटरवर @gunsnrosesgirl3 नावाच्या अकाऊंटवरून शेअर करण्यात आला आहे. 18 सेकंदांचा हा व्हिडिओ आतापर्यंत 1.5 दशलक्ष वेळा पाहिला गेला आहे, तर 8 हजारांहून अधिक वापरकर्त्यांनी या व्हिडिओला लाईक केले आहे.



**ज्वालामुखीतून धगधगता उकळणारा लावा पृथ्वीच्या पृष्ठभागाला फाडून बाहेर येताना दिसत आहे. महत्त्वाचं म्हणजे हा ज्वालामुखी पाहण्यासाठी अनेक पर्यटकांनी गर्दी केली आहे. डोळ्यांच्या पापण्या लवत नाहीत तोवर हा लावा पुढे पुढे सरकत होता. ज्वालामुखीवर असंख्य ज्वालामुखी आहेत. त्यापैकी फार कमी सक्रीय आहेत. या ज्वालामुखींना झोपलेले राक्षस असं विशेषण देण्यात आलेले नाही.**

# सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे मराठा आरक्षणाला पाठबळ?

।नवी दिल्ली
।महाईन्यूज ।वृत्तसंस्था ।

आर्थिक दुर्बलांना (ईडब्ल्यूएस) नोकरी आणि प्रवेशांसाठी देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणावर शिक्कामोर्तब झालं आहे. सुप्रीम कोर्टाने आर्थिक दुबल घटकांना दिलेलं १० टक्के आरक्षण कायम ठेवलं आहे. १०३ व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून ही करण्यात आलेली ही आरक्षणाची तरतूद वैध असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर आता प्रतिक्रिया उमटत असून मराठा आरक्षणातील याचिकाकर्ते विनोद पाटील यांनीही भाष्य केलं आहे.

"आम्ही सुप्रीम कोर्टाच्या निकालाचं स्वागत करतो. हा निर्णय अतिशय योग्य आहे. याचा मराठा आरक्षणाशी थेट संबंध आहे. आम्हीही सातत्याने मूळ किंवा मराठा आरक्षणाशी कोणताही संबंध नसल्याचं सांगत होतो. याचं कारण मराठा आरक्षण फक्त नोकऱ्या आणि शिक्षणासाठी असून राजकीय नाही. तसंच ईडब्ल्यूएस आरक्षण नोकरी आणि शिक्षणात आहे, " असं विनोद पाटील म्हणाले. "आम्हाला सातत्याने ५० टक्के मर्यादेचं काय होणार याची भीती वाटत होती. पण निकाल पाहिला तर याच्यात स्पष्टपणे ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून १० टक्क्यांचं आरक्षण स्वीकारलं आहे. यामुळे आता मराठा आरक्षणाचा फेरविचार होणं गरजेचं आहे. पुनर्विचार याचिकेत आम्हाला याचा आधार घेता येईल," असं विनोद पाटील यांनी सांगितलं आहे. "मराठा आरक्षणाच्या लढ्याला हा बळकटी देणारा हा निर्णय आहे. मराठा आरक्षणात वारंवार ५० टक्क्यांची मर्यादा, राज्यांचे अधिकार हे मुद्दे मांडण्यात आले.



# राजधानीचा श्वास गुदमरतोय

## हवेची गुणवत्ता 'अत्यंत खराब'

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक सोमवारी सकाळी 'अत्यंत खराब' श्रेणीत नोंदवला गेला. पूर्वानुमान प्रणाली ने याबद्दलचा अहवाल सादर केला आहे. गेल्या आठवड्यात सलग तीन दिवस हवेची गुणवत्ता 'गंभीर श्रेणी'मध्ये होती.

"एअर क्वालिटी अर्ली वॉर्निंग सिस्टीम दिल्ली" ने जारी केलेल्या आकडेवारीनुसार शहरातील एकूण निर्देशांक 326 वर राहिला आहे कारण येत्या काही दिवसांत हवेची गुणवत्ता आणखी खालावणार आहे. "हवेची गुणवत्ता खराब होण्याची शक्यता आहे पण ८ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर या कालावधीत ती अत्यंत खराब श्रेणीत राहील," असे त्यात म्हटले आहे.0 ते 100 पर्यंत हवा गुणवत्ता निर्देशांक चांगला मानला जातो तर 100 ते 200 पर्यंत तो मध्यम असतो. 200 ते 300 पर्यंत हवेची गुणवत्ता खराब असते आणि 300 ते 400 पर्यंत ती अत्यंत खराब असते असे म्हटले जाते. 400 ते 500 किंवा त्यापेक्षा जास्त हवेची गुणवत्ता गंभीर मानली जाते.



# इराणमधील हिजाबविरोधातील आंदोलनाचे लोण पोहचले भारतात

## केरळमध्ये सध्या हिजाबविरोधात निदर्शने आणि जाळपोळीच्या घटना

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

इराणमध्ये गेल्या काही दिवसांपासून सक्तीच्या हिजाब प्रकरणी सरकारविरोधात आंदोलन केले जात आहे. या आंदोलनात आत्तापर्यंत अनेकांनी आपला जीव गमावला. त्यामुळे इराणमध्ये सध्या हिजाबला तीव्र विरोध होताना दिसतोय. मात्र इराणमधील हिजाबविरोधातील आंदोलनाचे लोण आता भारतात पोहचले आहे. केरळमध्ये सध्या हिजाबविरोधात तीव्र निदर्शने आणि जाळपोळीच्या घटना घडल्या आहेत.

केरळमधील कोझिकोडमध्ये 9 नोव्हेंबरला (रविवारी) हिजाबची जोळपोळ करत तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी काही लोकांनी इराणधील हिजाबविरोधातील आंदोलनाचे समर्थन करत एकजुटीचा संदेश दिला. या आंदोलनात मोठ्याप्रमाणात महिलांनी सहभाग घेतला होता.

इराणमध्ये हिजाबविरोधात सुरू असलेल्या आंदोलनामुळे सरकार धास्तावले आहे. राजधानी तेहरानमध्ये सुमारे एक हजार आंदोलकांवर खटला चालवण्याची तयारी सुरू आहे. सरकारी आंदोलकांवर तोडफोड, मृत सुरक्षा रक्षकांशी गैरवर्तन आणि सार्वजनिक मालमत्तेला आग लावण्याचे आरोप आहेत.

याआधी हिजाबविरोधी निदर्शने रोखण्याचे सरकारचे सर्व प्रयत्न फोल ठरले आहेत. त्यामुळे आंदोलकांचे आंदोलन अजूनही सुरूच आहे. सरकार या आंदोलनाला शत्रू देशांचे कारस्थान असल्याचा आरोप करत आहे.



### महसा अमीनीच्या मृत्यूमुळे इराणमध्ये आंदोलन

इराणमध्ये सध्या हिजाबचा मुद्दा मोठ्याप्रमाणात तापतोय. आत्तापर्यंत झालेल्या आंदोलनादरम्यान अनेकांनी आपला जीव गमावला. मात्र हा मुद्दा इराणमध्ये 22 वर्षीय महसा अमिनीचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला, त्यामुळे अजूनच चिघळला. यानंतर देशभरातील लोकांनी रस्त्यावर उतरून सरकारविरोधात निदर्शने केली. महसा या तरुणीवर इस्लाम धर्माच्या ड्रेस कोडचे उल्लंघन केल्याचा आरोप होता. या आंदोलनांमुळे देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे.

# दिशा पटानीचा 'नवा बकरा'

बॉलीवूड अभिनेत्री दिशा पटानी सोशल मीडियावर भलतीच सक्रिय पहायला मिळते. पापाराझीचे कॅमेरे तर तिच्या मागावरच असतात. काहीच नाही तर टायगर श्रॉफ सोबतच्या तिच्या नात्यावरनं तर ती नेहमीच चर्चेत पहायला मिळते. अर्थात आतापर्यंत ना टायगर,ना दीशा कोणीच या विषयावर मोकळेपणानं बोललेलं नाही.

एकदा टायगर म्हणाला होता,"मी आणि दिशा खूप चांगले मित्र आहोत आणि तो स्वतः सिंगल आहे". मध्ये त्यांच्या ब्रेकअपची बातमी देखील भलतीच गाजली होती. पण चाहते मात्र या बातमीवर विश्वास



ठेवायला तयार नव्हते. सध्या ती आपला जिम ट्रेनर आणि मित्र अलेक्झेंडर एलेक्स सोबत फिरताना दिसतेय,त्यामुळे चाहते मात्र चक्रावून गेलेयत आणि खूप वेगवेगळ्या गोष्टी बोलू लागलेयत. त्याचं झालं असं की दिशा पटानीला मुंबईत अलेक्झेंडर एलेक्ससोबत पाहिलं गेलं होतं. यावेळी तो दिशाबद्दल खूपच प्रोटेक्टिव्ह दिसून आला. दिशा आणि एलेक्स बान्द्र्यात एका रेस्टॉरंटमध्ये गेले होते. तेव्हा पापाराझीच्या एका ग्रुपनं त्यांना अक्षरशः घेरलं. यादरम्यान एक चाहतादेखील दिशासोबत बातचीत करताना दिसला. पण अलेक्झेंडर एलॅक्सने बॉडीगार्डचं काम यावेळी केलं. दिशाच्या खांद्यावर हात ठेवत एलेक्सनं तिला कव्हर केलं आणि पुढे चालत रहायला सांगितलं.



# अवघ्या जगाला डान्सने भुरळ पाडणारी 'चंद्रा' डान्स शो बाहेर...

चंद्रमुखी' या चित्रपटातून प्रसिद्धीच्या झोतात अभिनेत्री अमृता खानविलकरने तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने लाखो चाहत्यांच्या मनात घर केलं आहे. फक्त अभिनय आणि सौंदर्यच नाही, तर कोणत्याही प्रकारचं नृत्याचं प्रशिक्षण न घेता अमृताने तिच्या डान्सने प्रत्येकाला थक्क केलं आहे. तिच्या 'चंद्रा' गाण्याने सर्वांवरच आपली छाप सोडली आहे. अगदी मोठ्यांपासून लहानांपर्यंत सर्वांनाच वेड लावले आहे. अख्ख्या महाराष्ट्राला नाचवणाऱ्या चंद्राची भारतासह आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रेक्षकांवरही भुरळ पडली आहे. अमृता सध्या 'झलक दिखला जा' या शोमध्ये तिच्या डान्सची जादू दाखवत होती. ती या शोमध्ये टॉपलाही होती. मात्र ती या शोमधून बाहेर पडली आहे. तिच्या चाहत्यांसाठी हा मोठा धक्काच आहे.

अमृता 'झलक दिखला जा' मधून बाहेर पडली आहे. टॉप ३ मध्ये अमृता पोहोचेल अशी चर्चा सुरू असताना ती स्पर्धेतून बाहेर पडल्यानं चर्चेला उधाण आलं आहे. अमृतासोबत पारस कलनावत हा देखील स्पर्धेबाहेर पडलाय. प्रत्येक हफ्त्यात एक स्पर्धक शो बाहेर जात असतो. मात्र यावेळी शोमध्ये डबल एलिमिनेशन झाल्यानं प्रेक्षकही नाराज असल्याचं दिसताय. यावेळी करण जोहरने स्पर्धेतून बाहेर जाणाऱ्या स्पर्धकाचं नाव घोषित केल. यावेळी कुणालीही ते नाव  अमृताचं असेल असं वाटलं नव्हतं. तिचं नाव घेतानाच तिच्यासह स्पर्धक आणि प्रेक्षकांनाही धक्काच बसला. कोणीही तिच्या या एलिमेशनची अपेक्षाच केली नव्हती. हा निर्णय सर्वांसाठीच धक्कादायक होता.

# लिव्ह इनमध्ये राहिले, लग्न केलं अन् 15 वर्षानंतर घटस्फोट...

मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणुन बॉलिवूडमध्ये प्रसिद्ध दिग्दर्शक, पटकथा लेखक आणि निर्माती म्हणून आपली ओळखल निर्माण करणारी किरण राव आज तिचा ४९ वा वाढदिवस सादरा करत आहे. एका चित्रपटाच्या सेटवर आमीरसोबत झालेल्या भेटीने तिचे आयूष्यच बदलंले.

मात्र गेल्या वर्षी किरण बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खानसोबत घटस्फोट घेतल्याने चर्चेत होती. ती आमिर खानची दुसरी पत्नी होती आणि दोघांनी घटस्फोटाची घोषणा करताच इंडस्ट्रीत खळबळ उडाली होती. या जोडप्याच्या घटस्फोटामुळे त्याचे चाहते आणि मित्रांना खूप धक्का बसला होता.




किरणचा 'लगान' हा चित्रपट तिच्यासाठी खूप महत्वाचा ठरला या चित्रपटाने तिला केवळ तिचंकरिअरच नाही तर तिचा लाइफ पाटनरही दिला होता. 'लगान'च्या सेटवर ती पहिल्यांदा आमिर खानला भेटली. चित्रपटाच्या शूटिंगच्यावेळी तिला आमिरला सेटवर घेऊन यायची जबाबदारी देण्यात आली होती. त्यामुळे त्याच्यात बोलन झालं आणि काही काळातच दोघांची मैत्री झाली आणि या मैत्रीचं रुपांतर हळूहळू प्रेमात झालं. त्यानंतर 2002मध्ये आमिरचा त्याची पहिली पत्नी रीनासोबत घटस्फोट झाला.

असं म्हटंल जात की त्यावेळी त्याला खूप एकटं वाटायचं. एके दिवशी तो आणि किरण दोघेही जवळपास अर्धा तास फोनवर बोलले, त्यानंतर दोघांनाही एकमेकांबद्दल प्रेमाची भावना निर्माण झाली. त्यानंतर दोघं एकमेकांना डेट करू लागले. आमिर आणि किरण काही काळ लिव्ह-इनमध्येही होते. आमिर खान आणि किरण राव यांनी २००५ मध्ये विवाह केला. दोघेही त्याच्या वैवाहिक जीवनात खुप खूश होते.

# मॅडम कडक हाय' म्हणत मानसी नाईकने घातलाय धुमाकूळ..

आपल्या डान्स कौशल्य आणि सौंदर्याने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी अभिनेत्री मानसी नाईक सातत्याने चर्चेत येत असते. सोशल मीडियावरही ती सक्रीय असून नवनवे फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असते. आता ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे तेही 'एकदम कडक' चित्रपटातील 'मॅडम कडक हाय' या गाण्यामुळे. तिचे हे गाणे सोशल मिडियावर धुमाकूळ घालत आहे. एकदम कडक' चित्रपटाच्या चर्चेने सर्वत्र धुमाकूळ घातला आहे. अशातच नुकत्याच पार पडलेल्या भव्यदिव्य अशा 'एकदम कडक' चित्रपटाच्या संगीत अनावरण सोहळ्याने तर आगच पसरवली आहे. याचे कारण ही अर्थात विशेष आहे, ते म्हणजे चित्रपटातील कलाकार तर आहेतच मात्र या चित्रपटात अभिनेत्री आणि नृत्यांगना मानसी नाईक तिच्या दिलखेचक अदांनी 'मॅडम कडक हाय' या गाण्यावर थिरकताना दिसतेय. नुकताच 'एकदम कडक' चित्रपटाचा अनावरण सोहळा धूम धडाक्यात पार पडला त्यावेळी चित्रपटातील कलाकारांनी उपस्थित राहून आणि मानसीच्या एकदम कडक अशा 'मॅडम कडक हाय' या गाण्याच्या परफॉर्मन्सने कार्यक्रमाची शोभा द्विगुणित केली.




# हमारी फौज आ रही है' कुत्तेची रिलीज डेट जाहीर

बॉलीवूडमध्ये कायम आपल्या वेगळेपणानं प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारे दिग्दर्शक म्हणून विशाल भारद्वाज यांचे नाव घेता येईल. संगीतकार ते दिग्दर्शक असा त्यांचा प्रवास मोठा थक्क करणारा आहे. जगप्रसिद्ध साहित्यिक विल्यम शेक्सपियरचे फॅन असणाऱ्या भारद्वाज यांच्या चित्रपटांचा चाहतावर्ग मोठा आहे. आता त्यांचा एक नवा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामध्ये अर्जुन कपूर हा मुख्य भूमिकेत आहे.

लव फिल्म्स आणि विशाल भारद्वाज फिल्म्सदद्वारा निर्मित आणि टी-सीरीटीजद्वारे प्रस्तुत असलेल्या 'कुत्ते'या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून हा चित्रपट चर्चेत आहे. थरार आणि मनोरंजनाने भरपूर असलेल्या 'कुत्ते'या चित्रपटात अर्जुन कपूर, तब्बू, नसीरुद्दीन शाह, कोंकणा सेन शर्मा, कुमुद मिश्रा, राधिका मदन आणि शार्दुल भारद्वाज यांच्यासह प्रतिभावान कलाकारांचा समावेश आहे.



टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली पहिल्यांदाच ठरला

## 'आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ'

सिडनी।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



एक काळ असा होता जेव्हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये विराट कोहलीचा दबदबा पाहायला मिळत होता, पण गेल्या काही वर्षात किंग कोहलीच्या बॅटमधून धावा निघत नव्हत्या, मात्र ऑक्टोबर २०२२ या महिन्यात विराट कोहलीचे नशीबचं बदलले. तो कुठल्याही मैदानावर त्याला हवी तशी खेळी करताना दिसत आहे. त्यामुळेच विराट कोहलीला दीर्घ काळानंतर आयसीसीकडून हा पुरस्कार देण्यात आला. विराटला ऑक्टोबर २०२२ साठी 'आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सोमवार, ७ नोव्हेंबर रोजी, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) पुरुष आणि महिला खेळाडूंची घोषणा केली. पुरुष गटात विराट कोहली आणि महिला गटात पाकिस्तानच्या निदा दारला महिन्यातील सर्वोत्तम क्रिकेटपटू म्हणून गौरवण्यात आले आहे. ऑक्टोबर महिन्यात विराट कोहलीने खूप धावा केल्या. गेल्या महिन्यात विराटने चार सामन्यांत २ अर्धशतके झळकावली, त्यात पाकिस्तानविरुद्ध खेळलेली खेळी ही विशेष होती. विराट कोहलीला क्रिकेटच्या सर्वात लहान प्रकारामध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी ऑक्टोबर २०२२ साठी आयसीसी पुरूष खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले आहे. झिम्बाब्वेचा सिकंदर रझा आणि दक्षिण आफ्रिकेचा डेव्हिड मिलर यांनाही या पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते.

शेवटी किंग कोहलीने दोन्ही खेळाडूंना मागे टाकत प्लेअर ऑफ द मंथचा किताब पटकावला.

# सूर्यकुमारची अचंबित करणारी फटकेबाजी !

### भारतीय संघाचे प्रशिक्षक राहुल द्रविडने व्यक्त केले मत

सिडनी।
महाईन्यूज । वृत्तसंस्था





दोन वर्षांपूर्वी बघितलेला सूर्यकुमार आणि आत्ताचा सूर्यकुमार यात फरक आहे, जो मला स्पष्ट जाणवतो आहे. त्याने सरावात मन रमवले आणि विविध फटक्यांचा भरपूर सराव केला. त्याच्या सोबतीला सूर्याने तंदुरुस्ती आणि आहारावर लक्ष दिले आहे. मला वाटते त्याने केलेल्या कष्टाचे फळ त्याला मिळत आहे, असे मत भारतीय संघाचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी व्यक्त केले.

ट्वेन्टी-२० विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत कमालीचे आणि सर्वांना अचंबित करणारे फटके मारणाऱ्या सूर्यकुमारच्या या तेजावर द्रविडही खूश झाले आहेत. ते म्हणतात, 'नजर लागावी अशी फलंदाजी तो करतो आहे. तो जेव्हा काही फटके मारतो तेव्हा मलाही अचंबित व्हायला होत आहे. एखादा पट्टीचा कलाकार मोठ्या रंगमंचावर मोठी कला सादर करतो तसा सूर्यकुमार वर्ल्डकपच्या रंगमंचावर स्वत:चा शो सादर करतो आहे.

झिम्बाब्वे समोरच्या सामन्यात रिषभ पंतला संधी मिळाली. मोठा फटका मारायच्या प्रयत्नात रिषभ बाद झाला असला तरी संघ व्यवस्थापन त्याच्यावर नाराज नाही. त्याचबरोबर अश्विनने तीन फलंदाजांना बाद करून आपले महत्त्व परत पटवून दिले आहे. चर्चा अक्षर पटेलच्या जागी युझवेंद्र चहलला संधी का दिली जात नाही याची रंगू लागली आहे

**फलंदाजीत सुधारणेला वाव**

शेवटच्या साखळी सामन्यात भारतीय संघाने १८७ धावा उभारल्या तरीही फलंदाजीत सुधारण्याचा मुद्दा दूर होत नाही. के एल राहुल आणि रोहित शर्मा डावाच्या सुरुवातीला स्ट्राईक रोटेट करू शकत नाहीत, ही गोष्ट लपून राहिलेली नाही. राहुल द्रविड यांनी या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला थेट उत्तर दिले नसले तरी स्ट्राईक रेट बरोबर रोटेशन ऑफ स्ट्राईकचा मुद्दा महत्त्वाचा आहे, यात दुमत नाही. उपांत्य सामन्यात रोहित शर्मा आणि राहुलला तीच चूक सुधारावी लागणार आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही